ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख ३ आक्टोबर, १९५१ अंक ४०

## विविध माहिती

**क्षयरोग्यांसाठी इस्पितळ**—म्हैसूर राज्याच्या सरकारच्या देशी औषधी बोर्डानें आयुर्वेदीय औषधें देणाऱ्या क्षयरोग्यांच्या इस्पितळाच्या स्थापनेविषयीं सध्या विचार चालू केला आहे. म्हैसूर राज्यांत असें रुग्णालय स्थापावयाचें झाल्यास त्यासाठीं काय तयारी करावी लागेल, ह्याची चौकशी करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे.

**ही व्यापारी स्पर्धा, कीं थट्टा?**—सध्यां ब्रिटनमध्यें जपानी मालाचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. प्रदर्शनांत ठेवलेला जपानी माल त्याच प्रकारच्या ब्रिटिश मालापेक्षां २० ते ५० टक्क्यांनीं स्वस्त विकला जातो. खाकी शर्ट अवघ्या ६ आण्याला आणि कॅनव्हसचे बूट २। ते ५। रुपयांपर्यंत वरील प्रदर्शनांत मिळूं शकतात. जपानी मालाच्या स्वस्ताईमुळें ब्रिटिश व्यापारी चिंताग्रस्त झाले आहेत.

**नदीचा प्रवाह बदलून टाकला!**—स्टॅलिनग्रॅडजवळ एक मोठें विद्युत्पादक केंद्र बांधण्यांत येत आहे. ह्या धरणाच्या मार्गांत डॉन ही नदी येत असल्यामुळें तिचा प्रवाहच बदलून टाकण्यांत आला असल्याचें समजतें. दुसऱ्या महायुद्धांत ह्या नदीच्या कांठावर तुंबळ संग्राम झाला होता. नदीचें पात्र आतां मुद्दाम तयार करण्यांत आलेल्या दिशेनें वाहूं लागलें आहे.

**धार्मिक शिक्षणाची सक्ती**—सीलोनमधील सर्व सरकारी आणि निमसरकारी शाळांमधून पुढील जानेवारीपासून धार्मिक शिक्षण सक्तीचें करण्यांत येणार आहे, असें समजतें. धर्माचें शिक्षण कसें द्यावें तें शिक्षकांना मुद्दाम सांगण्यांत येणार आहे. सीलोनच्या सरकारच्या मतें, धार्मिक शिक्षण ही महत्त्वाची बाब आहे.

**निवडणुकीसाठीं होणारा खर्च**—भारताच्या सार्वत्रिक निवडणुकींत वापरण्यासाठीं मतदानाच्या २३ लाख पेट्या लागतील. प्रत्येक पेटीला ५ रुपये खर्च येईल आणि ती २० वर्षें टिकेल असा अंदाज आहे. निवडणुकीसाठीं एकूण सुमारें १० कोटी रुपये खर्च येईल.

**चीनसाठीं जपानी कापड**—कम्युनिस्ट चीनकडून मीठ घेऊन त्याच्या बदला ३,१०,००० वार कापड जपान चीनला पुरविणार आहे असें समजतें. जपानच्या व्यापारावरील बंधनें कमी करण्याच्या अमेरिकेच्या धोरणामुळें हा व्यापार शक्य झाला आहे. चीनकडून ३,४०० टन खनिज मीठ जपान घेईल. ह्या सौद्याच्या उलाढालीची अंदाजी किंमत १,०४,००० डॉलर्स होईल.

**इराणच्या तेलासाठीं रशिआची मागणी**—इराणकडे रशिआनें तेलाची मागणी केली आहे. इराण आणि रशिआ ह्यांच्यामध्यें व्यापारी करार होण्याची शक्यताहि दिसत आहे. रशिआकडून साखरेच्या कारखान्याची यंत्रसामुग्री आणि रेल्वेचे रूळ घेऊन त्याच्याबद्दल इराण आपला माल रशिआला देणार आहे, असें समजतें.

**गोवधाला बारा राज्यांत बंदी**—भारतांच्या उपराज्यांपैकीं १२ राज्यांनीं आतांपर्यंत गोवधाला बंदी केल्याचें समजतें ह्या राज्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें आहेतः—उत्तर प्रदेश, कूर्ग, दिल्ली, पूर्व पंजाब, अजमीर, मणिपूर, हैद्राबाद, सौराष्ट्र आणि कच्छ.

**कंपन्यांच्या नफ्यावर नियंत्रण**—कंपन्यांच्या नफ्याच्या वांटणीवर नियंत्रण घालण्याची सूचना अजून तरी सरकारपुढें नाहीं असा खुलासा अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांनीं केला आहे. सरकारनें नेमलेल्या औद्योगिक कोर्टानें अशी सूचना केलेली नाहीं. नियोजन मंडळानें मात्र कंपन्यांनीं आपल्या नफ्यावर स्वेच्छेनें नियंत्रण घालावें, अशी शिफारस केल्याचें त्यांनीं सांगितलें.

**ग्रामीण भागांतील उत्पन्नाची चौकशी**—संयुक्त प्रांत सरकारनें ग्रामीण भागांतील उत्पन्नाची चौकशी करण्यासाठीं तपासणी करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक जिल्ह्यांत चार-पांच गांवें निवडून त्यांतील कुटुंबांना एक प्रश्नपत्रिका देण्यांत येईल. संयुक्त प्रांतांत सुमारें ४०,००० ग्रामपंचायती आहेत. त्यांचें सहकार्य घेऊन उत्पन्नाचे आंकडे गोळा करण्याचें कार्य करण्यांत येणार आहे.

**मध्य भारतामधील जहागिरदारी**—मध्य भारतामधील जहागिरदारीची पद्धत सार्वत्रिक निवडणुका होण्यापूर्वी रद्द करण्याचें राज्य सरकारनें ठरविलें आहे. त्यासाठीं जरूर तो कायदा मंजूर व्हावा म्हणून मध्यभारत विधिमंडळाचें अधिवेशन ता. २२ ऑक्टोबरला बोलावण्यांत आलें आहे. सध्यां बिलाचा मसुदा चिकित्सा समितीपुढें आहे.

**हिंदीच्या प्रचारासाठीं**—इंडिअन एज्युकेशन चॅरिटी फंड ह्या नांवाचा एक निधि ऑल इंडिआ एज्युकेशन सोसायटीनें काढला आहे. ज्या प्रांतांची भाषा हिंदी नाहीं अशा प्रांतांत हिंदीचा प्रचार करण्यासाठीं सोसायटी दरमहा १०,००० रुपये खर्च करणार आहे. ह्या कार्यासाठीं अंबाला येथें ८० पदवीधरांना शिक्षण देण्यांत येणार आहे.

### भारत व अमेरिका ह्यांचा व्यापार

न्यूयॉर्क येथील भारतीय कॉन्सल जनरलनें आपला वार्षिक अहवाल नुकताच सादर केला आहे. अमेरिका आणि भारत ह्यांच्यामधील व्यापाराबाबत उपयुक्त माहिती अहवालांत आढळून येते. १९४९ साली भारतानें अमेरिकेला निर्यात केलेल्या मालाची किंमत २३·८ कोटी डॉलर्स इतकी झाली. १९५० साली निर्यात केलेल्या मालाची किंमत २६·१ कोटी डॉलर्स झाली. म्हणजे अमेरिकेच्या बाजारांत हिंदी मालाची किंमत १० टक्के वाढली. उलटपक्षीं, अमेरिकेनें भारताला निर्यात केलेल्या मालाची किंमत सालानुक्रमें २५·२ कोटी डॉलर्स आणि २१·२ कोटी डॉलर्स भरली. अमेरिकन मालाची हिंदी बाजारपेठेंतील किंमत सुमारें १६ टक्क्यांनीं कमी झाली. १९४९ साली भारत–अमेरिका व्यापारांत १·४ कोटी डॉलर्सची प्रतिकूल तफावत होती. १९५० साली ह्याच व्यवहारांत ४·९ कोटी डॉलर्सची अनुकूल तफावत पडलेली दिसून येते. भारतांत अमेरिकेकडून येणाऱ्या मालापैकीं पुढील मालाच्या आयातींत घट झालेली आढळून येतेः—दूध-दुभत्याचे पदार्थ, प्राणिज तेलें, कातड्याच्या वस्तू, रबर व त्याचे पदार्थ, पेट्रोलपासून तयार केलेल्या जिनसा, तांबें, इत्यादि. उद्योग-धंद्याला लागणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या आयातींतहि अशीच घट झालेली दिसून येते. अमेरिका भारताकडून ज्या वस्तू घेते त्यांच्या निर्यातींतही वाढ झालेली दिसते. कच्चीं कातडीं, कॉफी, चहा, मसाल्याचे पदार्थ, तेल बिया, ह्यांची निर्यात बऱ्याच प्रमाणांत वाढली आहे. ताग व तागाचे पदार्थ, लोकर, खेळणीं, इत्यादि मालाच्या निर्यातींत मात्र घट झाल्याचें दिसून येतें. अमेरिकेच्या निर्यात व्यापारांत भारताचें जें स्थान होतें त्यांत मात्र दोन्ही वर्षीं फरक पडलेला दिसत नाहीं. अमेरिकेच्या निर्यातीपैकीं २ टक्के निर्यात भारत घेतो. अमेरिकेच्या आयात व्यापारांतील भारताचें स्थान मात्र जरा वर सरकलेलें दिसलें. १९४९ साली अमेरिकन आयातींत भारताचा वांटा ३ टक्के होता, तो १९५० सालीं ३·८ टक्के झाल्याचें दिसून येते. १९४९ सालीं अमेरिकेचा एकूण निर्यात–व्यापार १२०५·१ कोटी डॉलर्सचा होता, तो १९५० साली १०२५·५ कोटी डॉलर्स इतकाच झाला. अमेरिकेच्या आयातींत मात्र वाढ झालेली नमूद करण्यांत आली आहे.

---

### स्विस सरकारची भारतास देणगी

स्विस सरकारनें अंदाजें ५,००,००० स्विस फ्रँक्स म्हणजे ५,५०,०५५ रुपये किंमतीचें गोठविलेलें दूध, दुधाची भुकटी, औषधें आणि द्राक्षार्क हे पदार्थ भारत सरकारला भेट म्हणून देण्याचें ठरविलें आहे. पुढील नोव्हेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत हे पदार्थ येथें येऊन पोचतील अशी अपेक्षा आहे.

---

### गांधी जयंतीपासून आरोग्य तिकिटांची मोहीम सुरू

भारत सरकारच्या आरोग्य खात्यातर्फे महात्मा गांधी जयंति दिनापासून म्हणजे २ ऑक्टोबर, १९५१ पासून सुमारें १½ कोटी आरोग्य तिकिटें खपविण्याची मोहीम सुरू करण्यांत आली आहे. या खपामुळें आलेलें उत्पन्न आरोग्य मंत्र्यांच्या धर्मादाय निधीस देण्यांत येणार असून, त्याचा आरोग्य विकास योजनांसाठी विनियोग करण्यांत येईल.

---


दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

—लि., सांगली.—

स्थापना १९२७.

मुख्य कचेरी : हायस्कूल रोड, सांगली

तारेचा पत्ता RAYAT BANK फोन नं. ३०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | २,४९,२०० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | २,१०,५९० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,४३,०९७ |
| खेळतें भांडवल | | रु. १७,००,००० चे वर. |

शाखा

(१) जत (२) मिरज (३) तासगांव

बँकेची ज्युबिली १९५२ सालांत आहे.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

रा. बा. आरवाडे, B. A., LL. B. चेअरमन

ना. पां. ठाणेदार, मॅनेजर



( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | ... | रु. १२,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन.

के. डी. शिराळकर मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ३ आक्टोबर, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## वीज-तुटवडा व त्यावर उपाय

यंदा पाऊस कमी पडल्यामुळें अनेक अनर्थ होतील, त्यापैकीं मुंबई-पुण्याच्या नागरिकांना सर्वांत जास्त धक्का वीज-पुरवठा कमी होणार ह्या बातमीनेंच बसला असेल.

गेलीं कांहीं वर्षें या प्रदेशांतील विजेची मागणी वाढत चाललेली आहे. लोकसंख्येंत वाढ, औद्योगिक हालचालींत वाढ, रेल्वे वहातुकींत वाढ, लष्करी कामें, वगैरे सर्व कारणांनीं गेल्या दहा वर्षांत मागणी वाढली, आणि १९४७ मध्यें टाटा—जी. आय. पी. मिळून २,७६,००० कि. वॉ. यंत्रशक्तीवर जास्तींत जास्त २,१८,२०० कि. वॉ. म्हणजे ७९% पर्यंत मागणी गेली. चार वर्षांत ती आणखी वाढून नवीन औद्योगिक मागणी पुरवणें अशक्य व घरगुती, व्यापारी मागणी पुरवणें अवघड होऊन बसलें. गेलीं २ वर्षें परिस्थिति हाता-तोंडास आहे आणि जरा खटकलें कीं अनर्थ होईल, ही भीति होतीच.

यंदा घाटांत पाऊस ३०% कमी होऊन टाटांचीं तळीं न भरल्यामुळें (फक्त मुळशी तलाव भरलेला, तोहि आतांच खालीं जात आहे.) आतां दिसत आहे कीं ऑक्टोबर १९५१ ते जून १९५२ पर्यंत नेहमींच्यापेक्षां २५% वीज कमी उत्पन्न होईल आणि खर्चांत तितकी बचत या ना त्या मार्गानें करावी लागेलच. न केल्यास १९५२ च्या उन्हाळ्यांत वीजपुरवठा बंद करण्याची पाळी येईल.

या सर्व प्रकरणाचा इतिहास बघतां, कांहीं ठळक गोष्टी नजरेस येतात.

(१) १९४६ मध्यें कराराप्रमाणें टाटा कंपन्यांनीं रेल्वेला त्यांची मागणी १९४८ पर्यंत २५,००० कि. वॉ. नें कमी करण्याची सूचना दिली. परंतु रेल्वेनें चोला केंद्रासाठी मागविलेलीं ३०,००० कि. वॉ. चीं बाष्प-यंत्रें अद्यापि न आल्यानें, तें होऊं शकलें नाहीं.

(२) १९५५ मध्यें टाटा कंपन्यांचा परवाना संपत आहे व त्यापुढच्या अनिश्चित भवितव्यामुळें व जल-शक्तीच्या सर्व योजना सरकारी हातांत ठेवण्याच्या धोरणामुळें टाटा कंपन्या आणखी भांडवल घालून त्यांची उपलब्ध शक्ति वाढवूं शकत नाहींत.

(३) मुंबई सरकारच्या ग्रिड खात्याच्या व मध्यवर्ती सरकारच्या वेळोवेळीं बसलेल्या समित्यांच्या हातून कागदी घोडे नाचविण्यापलीकडे अजून प्रत्यक्ष फारसें काम झालें नाहीं. इंग्लंडहून यंत्रसामुग्री येण्यास नेहमी उशीर लागतो हें सुप्रसिद्ध असूनहि ती लौकर मागविली गेली नाहीं, आणि इतर देशांतूनहि मागविली नाहीं. १९५२ पर्यंत चोला केंद्रांत ४०,००० कि. वॉ. च्यावर निर्मिति होणार नाहीं.

(४) टाटा कंपन्यांनीं भिरा येथें २२,००० कि. वॉ. चें नवीन यंत्र बसविण्याचें हातीं घेतलें आहे; खोपोलीच्या यंत्रांची सुधारणा केली आहे; नवी एक लाख व्होल्टची लाइन टाकून तारा तापण्यांत जाणारी वीज वाचविली आहे; वगैरे प्रयत्नांनीं मिळून शक्ति ३०,००० कि. वॉ. नें वाढविण्याची व्यवस्था केली आहे. भिराला ८,००० कि. वॉ. चें आणखी यंत्र, भिवपुरीला २४,००० कि. वॉ. चीं यंत्रें, मुळशी तलावाच्या तळांतलें पाणी व कुंडली बंधाऱ्याचें पाणी चढवून वापरण्यासाठी पंप आणि नियोजित भामा बंधारा वगैरे सर्व योजना झाल्यास एकंदरींत उपलब्ध शक्ति (चोला धरून) कमाल ३,७०,००० कि. वॉ. पर्यंत व वार्षिक उत्पादन १७० कोटी यूनिटपर्यंत जाईल.

परंतु एवढ्यानेंही चार-पांच वर्षांनीं भागेनासें होईल हेंहि नक्कीच.

तेव्हां, आणखी उत्पादन वाढविण्यासाठी दूरगामी योजना म्हणजे ५०,००० कि. वॉ. चें नवीनच बाष्प शक्ति केंद्र बांधणें, नंतर कोयना योजना किंवा तिचा भाग हातीं घेणें, ह्यांचा विचार चालूं आहे.

आजच्या निकडीच्या परिस्थितींत मागणी कमी करण्याच्या प्रयत्नांचा पुढील आंकड्यांच्या दृष्टीनें विचार केला पाहिजे.

उत्पादन व खप : (आंकडे १९४७ चे, कोटी यूनिटचे)

| उत्पादन एकूण | औद्योगिक | रेल्वे व ट्रॅम | व्यापारी | घरगुति | लष्करी व इतर | एकूण उपयोग | घाया |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११७·८ | ६१·१ | २४·२ | ४·८ | ५·६ | २·९ | ९८·६ | १९·२ |

काटकसरीला वाव उद्योगधंद्यांत व रेल्वेंतच विशेष आहे; घरें, सिनेमा वगैरेंत फारसा नाहीं. तेव्हां साहजिक पुढील उपाय सुचून त्यांचा विचार होत आहे.

(१) मुंबईस ऑफिसें शनिवारीं बंद ठेवून लोकल गाड्या कमी करणें. यास सरकारचा विरोध आहे.

(२) गिरण्यांचे तास कमी करणें, आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशीं वेगवेगळ्या गिरण्यांना सुट्टी देणें. यास कामगारांचा विरोध आहे.

(३) गिरण्या दोन महिने बंद ठेवणें. यास मालकांचा विरोध आहे.

(४) कांहीं गिरण्या बंद करणें. यास सर्वांचाच विरोध आहे.

(५) पुण्याच्या गाड्या वाफेच्या एंजिनांनीं चालविणें. यामुळें लागणारा वेळ, खर्च, नोकरवर्ग, गैरसोय, एंजिनांचा तुटवडा सर्वच परिस्थिति वाईट होईल व गाड्या कमी कराव्या लागतील हा बऱ्याच अंशीं रेल्वे खात्याच्या दूरदर्शीपणाच्या अभावाचा परिणाम आहे.

(६) घरीं, सिनेमांत, वगैरे उपयोग कमी करणें.

यावरून दिसतें कीं कोणच्याही उपायानें देशाच्या व त्यांतल्या त्यांत ह्या प्रदेशाच्या आर्थिक परिस्थितीस धक्का पोंचणार आहे. तेव्हां आतां सरकारचें कर्तव्य आहे कीं, सर्व संबंधित लोकांच्या म्हणजे रेल्वे, पुरवठा-कंपन्या, गिरण्या व मजूर यांच्या बैठकी

घेऊन कमीत कमी नुकसान होईल असे उपाय योजणें, व तात्पुरत्या उपयोगासाठी हातीं लागतील तीं लहान यंत्रें कामाला लावून आणखी ५,०००–६,००० किं वॉ. का होईना, शक्ति वाढवणें; आणि लोकांना खाजगी वीज उत्पन्न करण्यास मदत करणें.

जे उपाय ठरतील ते सक्तीचे केल्याशिवाय अनर्थ होईल. उदाहरणार्थ, मजुरांनीं नेत्यांच्या चिथावणीनें अडथळे आणल्यास ठाम धोरण ठेवलें पाहिजे. एका दिवशीं सर्वांनी सुट्टी घेण्याचा हक्क हा कांहीं सर्वांच्या नोकऱ्या टिकून रहाण्यापेक्षां किंवा कापड उत्पादन चालूं रहाण्यापेक्षां जास्त महत्त्वाचा नाहीं.

हें सर्व तात्पुरत्या अडचणींतून सुटका मिळविण्यासाठीं. परंतु यापेक्षां दूरदर्शी विचार करणें हें भारत व मुंबई सरकारांचें कर्तव्य आहे. पुढील ५ वर्षांत बऱ्याच लहान योजना तडीस नेणें, त्याचबरोबरच कोयना योजना सुरू करणें, हे उपाय न केल्यास ह्या प्रदेशास सध्यां देशांत अग्रेसरत्व आहे तें गमवावें लागेल, देशाच्या अंतर्गत व अंतरराष्ट्रीय आर्थिक हितसंबंधांस बाध येईल आणि मुंबई शहराची व राज्याची औद्योगिक वाढ खुंटेल

ताबडतोबीचे व लांबचे दोन्ही उपाय निश्चयानें केले, तरच या प्रदेशाचें औद्योगिक महत्त्व टिकून रहाणार आहे.

---

## श्री. शंकरराव किर्लोस्करांना ६१ वें वर्ष !



### अभीष्टचिंतन

किर्लोस्कर बंधु लि. चे जनरल मॅनेजर व किर्लोस्कर–स्त्री–मनोहरचे संस्थापक–संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांस ता. ८ ऑक्टोबर, १९५१ रोजीं ६० वर्षे पूर्ण होऊन ६१वें वर्ष लागत आहे. त्यांनीं आपल्या मासिकांचे द्वारां महाराष्ट्रीयांस प्रगतिपर वळण लावण्याचें कामीं फार महत्त्वाची कामगिरी केलेली आहे. संघर्षाचें खरें कारण समाजांतील घटकांची एका समान पातळीवर उघड येण्याची नाखुषी हेंच होय, हें श्री. शंकररावांनीं केव्हांच ओळखलें होतें. कारखानदार–कामगाराप्रमाणें कारखानदार–कारखानदारांतहि अविश्वास, अप्रीति, द्वेष हीं त्यांना आढळलीं. अर्थव्यवस्थेंतील ह्या सर्व महाराष्ट्रीय घटकांस एकत्र आणून त्यांचेमध्यें सहकारी व संघटना वृत्ति निर्माण करण्यांत श्री. शंकररावांनीं अपूर्व यश संपादन केलें आहे. श्री. शंकररावांच्या मनमिळाऊ, आनंदी, उत्साही व उद्योगी वृत्तीचें अनुकरण व्यापक प्रमाणावर होणें इष्ट आहे. त्यांचें अजर तारुण्य दीर्घायु होवो ! "डेकन कॅन डू इट" ह्या त्यांच्याच शब्दांच्या चालीवर, "शंकरराव कॅन डू इट" असा विश्वास वाटतो.

## श्री. शंकरराव किर्लोस्करांची कामगिरी

### उद्योग, उत्साह आणि आत्मोन्नति ह्यांचा अखंड झरा

किर्लोस्कर बंधु लि., या कारखान्याचे विद्यमान जनरल मॅनेजर व किर्लोस्कर, स्त्री व मनोहर या सर्वश्रुत मासिकांचे संस्थापक व संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर हे ८ आक्टोबर, १९५१ या दिवशीं आपल्या वयाच्या ६१ व्या वर्षांत पदार्पण करीत असल्यानें त्या निमित्तानें त्यांचें आयुरारोग्य चिंतणें हें अगदीं यथोचित कर्तव्य आहे. श्री. शंकरराव किर्लोस्कर मला मोठ्या भावाप्रमाणें असून त्या दृष्टीनें त्यांच्याबाबत मी विस्तारानें लिहिणें म्हणजे कदाचित् आपणच आपल्या माणसाचें गुणवर्णन ज्यास्त करतो असें होईल. म्हणून माझ्या मनावरील ठळक छाप फक्त लिहीत आहे.

श्री. शंकरराव किर्लोस्कर हें नांव मनःचक्षुपुढें उभें राहिलें कीं, स्वाभाविकच आपल्या मनांतील सुद्धां उदासनिता पळून जाऊन आपल्या भोंवताली असलेलें जग कसेंही असलें तरी आपलें मन प्रसन्न होतें, इतकी त्या नांवांत जादू भरलेली आहे. आज त्यांची आठवण कोणत्याही विस्तृत लेखांत न करतां त्यांच्या स्वभावांतील व आयुष्यांतील जो गुण अत्यंत उत्कटतेनें डोळ्यासमोर उभा राहातो व ज्याचा माझे मनावर मोठा परिणाम झाला आहे, त्याचाच उल्लेख करतो. उद्योग, उत्साह व आत्मोन्नती हे विचार त्यांच्याबाबतच्या आठवणींनेंही प्रत्येकाचे तोंडावर न कळतही यावे यापेक्षां त्यांच्या विचाराची समाजावर बसलेली छाप दुसऱ्या कोणत्या शब्दानें व्यक्त करतां येईल ? किंबहुना उद्योग, उत्साह व आत्मोन्नती ह्या त्रयींचा श्री. शंकरराव किर्लोस्कर हे एक झराच आहेत. या तिन्ही गुणांचा परिपोष कोणीही आपापल्या परीनें करून घेऊन आपली उन्नति करून घ्यावी इतकी उज्ज्वलता त्या तीन गुणत्रयीमध्यें असून श्री. शंकरराव किर्लोस्कर म्हणजे त्या तीन गुणांचा परिपाकच होत.

चाळीस वर्षांपासून समाजाच्या पुनर्घटणांकडे अतिशय सूक्ष्म पण विशाल व भव्य नजरेनें पाहून त्याबाबत जरूर असलेल्या विचारांची टाकी श्री. शंकरराव किर्लोस्कर अगदीं सातत्यानें मारीत असल्यानें महाराष्ट्रीय तरुण स्त्री–पुरुषांतील आजची विचारशक्ति व विचारक्रांति ही बहुंशीं त्यांच्या प्रयत्नाचें फळ आहे, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. आजही या ६१ व्या वर्षांत श्री. शंकररावांची सर्व शक्ति या अशा कार्यांतच व्यग्र होत आहे असें म्हटलें तर तें सत्य आहे असें आढळून येईल.

परवां मी कोठेंतरी ते संसदेच्या निवडणुकीस उभे रहाणार आहेत असें वाचलें. असें असलें तर त्यांच्या दुर्दमनीय आशावादी प्रयत्नांचा उपयोग सर्व भारतवासीयांनाच होण्याचा सुयोग दिसतो. या व अशा सारख्याच त्यांच्या अनेक कार्यांत यश येण्याकरितां त्यांना यापुढेंही उदंड आयुरारोग्य लाभो, असें इच्छितों.

ओगलेवाडी.
२५ सप्टेंबर, १९५१ श. गो. भाले

---

### दि विजय टेक्स्टाइल्स लि., पुणें

वरील कंपनीचा कारखाना गेले १५ महिने बंद होता, तो पुनः नुकताच सुरू झाला आहे, असें समजतें.

### भारताला कोणती निर्गत डॉलर्स देते ?

ज्या वस्तू अमेरिकेला निर्यात करून भारताला डॉलर्स मिळातात त्यांच्या व्यापाराचें एकसूत्रीकरण करून उत्पादनाला कांहीं विशिष्ट दिशा देतां येण्यासारखी आहे किंवा नाहीं ह्याचा विचार करण्यासाठी इंडिअन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें एक कमिटी नेमली आहे. भारताकडून अमेरिकेला काळी मिरीं, वेलदोडे, काजू, सुंठ, लेमनग्रास इत्यादि मालाची निर्यात करण्यांत येते. ह्या व्यापाराबाबत भारताच्या अमेरिकेंतील व्यापारी प्रतिनिधींनीं दिलेला इषारा मात्र लक्षांत घेतला गेला पाहिजे. मालाच्या दर्जाबद्दल भारतीय व्यापारी काळजी घेत नसल्यामुळें अमेरिकेंत भारतीय व्यापाऱ्यांबद्दल प्रतिकूल मत बनत चालल्याबद्दलचा हा इषारा आहे. निर्यात होणाऱ्या मालांत भेसळ असते अशी तक्रार आहे ह्यासंबंधीं नियोजन मंडळावर कौन्सिलचा जो प्रतिनिधी आहे त्यानें टीका केली आहे. सरकारचा निर्णय मात्र अजून व्हावयाचा आहे भारताकडून अमेरिकेला काळ्या मिऱ्यांचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर होतो. १९५० सालीं अमेरिकेनें एकूण ४·६ कोटी डॉलर्स किंमतीचीं काळी मिरीं आयात केलीं. त्यापैकीं ३·७ कोटी डॉलर्सचीं म्हणजे ८० टक्के मिरीं भारतानें अमेरिकेला निर्यात केली होती. काळ्या मिऱ्यांच्या निर्यातींत आणखी वाढच होत आहे भारताखेरीज इंडोनेशिआनेंही मिऱ्यांच्या निर्यातींत वाढ केली आहे इंडोनेशिआची निर्यात ३० लाख डॉलर्सवरून ८० लाख डॉलर्स पर्यंत वाढली आहे काजूंची निर्यातही वाढत्या प्रमाणावर होत आहे. १९४९ सालीं भारतानें १·३९ कोटी डॉलर्स किंमतीच्या काजूची निर्यात केली होती. १९५० सालीं १·५७ कोटी डॉलर्स किंमतीचे काजू निर्यात करण्यांत आले. भारतीय काजूंची किंमत वाढल्यामुळें ही वाढ झाली आहे. भारत आणि इंडोनेशिआ हे दोनच देश अमेरिकेला लागणारीं काळी मिरीं बहुशः पुरवतांत. ह्या देशांशिवाय लेबॅनॉन, सीलोन, सयाम आणि फ्रेंच मोरोक्को ह्या देशांकडूनही काळी मिरीं निर्यात होतात. परंतु त्यांचीं स्पर्धा जाणविण्याइतकी तीव्र स्वरूपाची नाहीं.

### श्री. सोहनी व श्री. चाफेकर

भारत सरकारच्या वेधशाळांचे प्रमुख अधिकारी श्री. व्ही. व्ही. सोहनी हे चालू महिन्यांत स्वित्झर्लंडमध्यें लॉसेन येथें भरणाऱ्या जागतिक हवामानशास्त्र संघटनेच्या कार्यकारी समितीच्या बैठकीस उपस्थित राहतील. श्री. सोहनी ३० सप्टेंबर रोजीं एअर इंडिया इंटर नॅशनलच्या विमानानें मुंबईहून निघाले. ऑक्टोबरच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यांत भारतांत ते परत येतील.

मध्यवर्ती वाहतूक खात्याच्या रोडस आर्गनिझेशनमधील डे. कन्सल्टिंग इंजीनियर श्री. एच. पी. सिन्हा आणि मुंबईच्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे चीफ इंजीनियर श्री. एम. एल. चाफेकर, लिस्बन येथें भरत असलेल्या आंतरराष्ट्रीय रोडस काँग्रेसमध्यें भारताचें प्रतिनिधित्व करीत आहेत. या प्रतिनिधींनीं लिस्बनला जाण्यासाठी गेला महिनाअखेर मुंबईहून प्रयाण केलें.

### हिंदी तंबाखू

भारताचा तंबाखूच्या बाबतींत सबंद जगांत बराच वरचा अनुक्रम लागतो. भारतांत एकण ७ लक्ष एकरांत तंबाखूचा लागवड होऊन वार्षिक उत्पादन अंदाजें ५४ कोटी पौंड इतक होतें. बहुतेक सर्व तंबाखू स्वदेशांतच खपली, तरी सुमारें ७ कोटि पौंड तंबाखू निर्गत होते. ग्रेटब्रिटन हें भारताचें प्रमुख गिऱ्हाईक आहे. दक्षिण भारत, आणि त्यांतहि गुंटूर जिल्हा, तंबाखूच्या लागवडीस विशेष सोईचा आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

### जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लि.

वरील कंपनीनें ३० जून, १९५१ अखेर संपलेल्या वर्षी १० लक्ष रुपयांच्या तयार मालाची विक्री करून ३,४७,४३४ रु. ठोक नफा मिळविला. सर्व खर्च वजा जातां व ८५ हजार रु. घसारा काढून १,२४,६९२ रु. नफा उरला. त्यापैकीं ६० हजार रु. डिव्हिडंड रिझर्व्ह खात्यांत घालावे, ४५ हजार रु. इनकमटॅक्स रिझर्व्हकडे वर्ग करावे, १० हजारांची जनरल रिझर्व्हमध्यें भर घालावी, १० हजार फायर इन्शुअरन्स रिझर्व्हमध्यें घालावें, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. डिव्हिडंड रिझर्व्ह खात्यांतन ६% डिव्हिडंड + २% बोनस (दोन्ही करमाफ) अशी ऑर्डिनरी भागांस नफा वाटणी करण्यांत येणार आहे. प्रेफरन्स भागांना ५% डिव्हिडंड मिळेल. कंपनीची आर्थिक परिस्थिति भक्कम असून भरपूर वसूल भांडवल, पुरेसे रिझर्व्ह फंड, बँकांचें कर्ज नाहीं, फारच थोड्या ठेवी, शेअर्यांत व्याजी लावलेली व हाताशीं राखलेली मोठी रक्कम, किफायतशीर व्यवहार, मॅनेजिंग एजंटांचें अल्प वेतन व कमिशन, भरपूर डिव्हिडंड, इत्यादि गोष्टींमुळें कंपनीनें भक्कमपणा, सुरक्षितता व भागीदारांस चांगलें डिव्हिडंड ह्या सर्व गोष्टी साधल्या आहेत, त्याबद्दल चालकांचें अभिनंदन केलें पाहिजे.

(चेअरमन: व्ही. पी. वर्दे. मॅ. एजंटस: मेसर्स दांडेकर इंजिनिअर्स लि. वा. सभा : १४–१०–५१).

#### कंपनीचा संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ७,४२,२७५ | इमारती | २,८१,७६४ |
| ठेवी | ५९,८५० | प्लँट व मशिनरी | ३,७५,०१५ |
| रिझर्व्हज् | ४,९५,२६४ | इले. माशिनरी | १,६६,१०१ |
| देणीं | २,६०,४१२ | स्टॉक इन ट्रेड | २,६५,२१३ |
| नफा | १,३०,३०४ | बुक डेटस | १,०८,२२६ |
| | | इनव्हेस्टमेंट्स | ३,३९,७७२ |
| | | रोख व बँकांत | ५२,५२३ |

### ग्रेट ब्रिटनमधील आगामी प्रदर्शनें

१ इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज असोसिएशन, लंडन येथील चवथें प्रदर्शन. लंडन १६–१७ ऑक्टोबर, १९५१

२ इंटर–नॅशनल मोटर प्रदर्शन. लंडन. १७–२७ ऑक्टोबर, १९५१

३ ससेक्स इंडस्ट्रीज एक्झिबिशन व ट्रेड फेअर. ब्राइटन. १७–२७ ऑक्टोबर, १९५१

४ इंटर नॅशनल सायकल अँड मोटर सायकल एक्झिबिशन. लंडन १०–१७ नोव्हेंबर, १९५१

५ स्मिथफील्ड शो अँड ॲग्रिकल्चरल मशिनरी प्रदर्शन. लंडन. ३–७ डिसेंबर, १९५१.

## ब्रिटनमधील मध्यवर्ती आर्थिक नियोजन-मंडळाचें कार्य

१९४४ पासूनच ब्रिटनचें लक्ष युद्धोत्तर काळांत उत्पादन वाढवून कामावर असणारांची संख्या स्थिर कशी राखतां येईल या गोष्टीकडे वळलें होतें. हें साध्य होण्यासाठीं भांडवलाच्या उपयोगावर नियंत्रण ठेवणें, किंमती व विशेष प्रकारचा आवश्यक माल यांच्यावर नियंत्रणें ठेवणें, अनावश्यक मालाच्या उत्पादनावर नियंत्रण ठेवणें, यंत्रसामुग्रीच्या स्वरूपाच्या भांडवली मालाच्या उत्पादनाला उत्तेजन देणें व करपद्धतींत मालाच्या खपाच्या दृष्टीनें सुधारणा इ. गोष्टी करण्यांत आल्या. आर्थिक परिस्थितीचा कल ध्यानांत घेऊन त्या दृष्टीनें नोकऱ्यांच्या बाबतींत धोरण ठरविण्यांत आलें. या प्रकारच्या योजना युद्ध संपतांच सुरू करण्यांत आल्या तरी त्यांची विशेष तऱ्हेनें अंमलबजावणी १९४७ नंतर करण्यांत आली. आर्थिक नियोजन करणारें मंडळ हें ट्रेझरीचा एक महत्त्वाचा भाग बनलें व या मंडळावर अर्थशास्त्रज्ञ, आंकडेशास्त्रज्ञ उद्योगधंद्यांतील तज्ज्ञ इ. च्या नेमणुका केल्या जातात. या मंडळाचें कार्य आर्थिक बाबतींत योग्य त्या तऱ्हेच्या सूचना करण्याचें असतें. याची भूमिका फक्त सल्लागार मंडळाप्रमाणें असतें. विविध क्षेत्रांतून माहिती गोळा करून त्या दृष्टीनें योजनेची दिशा आंखणें हें या मंडळाचें मुख्य काम असतें. प्रत्यक्ष अंमलबजावणीचें कार्य मंत्रिमंडळ करतें. हें मंडळ प्रत्यक्ष व्यवहारामध्यें बरेंच उपयोगी पडतें असा अनुभव आला आहे. कारण, गेल्या चार वर्षांत भांडवल गुंतविण्याबद्दलचें धोरण ब्रिटनला बदलावें लागलें व त्या बाबतींत योग्य तें दिग्दर्शन या मंडळानें केलें. पोलाद, इमारती लांकूड, कोळसा या कष्टसाध्य मालाची विभागणी आर्थिक गरजेच्या दृष्टीनें कशी करावी हें या मंडळानें ठरविलें. आयातीबद्दलचें धोरण व कच्च्या मालाचा तुटवडा या बाबतींतहि या मंडळानें सल्ला दिला. अन्नपुरवठा, शेती मालाचें उत्पादन, परदेशांतील भांडवल गुंतवणुकीचें धोरण, वसाहतींत भांडवल गुंतविण्याचे कार्यक्रम, संरक्षणाच्या साधनांचें उत्पादन व मनुष्यबळाचा पुरवठा इ. बाबतींतहि हें मंडळ सल्ला देतें. प्लॅनिंग स्टाफचा मुख्य हा आर्थिक नियोजक मंडळाचा अध्यक्ष असतो. यामुळें प्रत्यक्ष कामांत एकसूत्रीपणा राहातो. याप्रमाणें नियोजनाचे कार्यक्रम ठरवितांना उद्योगधंद्यांतील लोकांचा सल्ला सरकारला मिळूं शकतो. यामुळें सरकार व उद्योगधंदे यांना परस्परांच्या गरजा व मतें समजूं शकतात. सरकारनें योजिलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी निरनिराळ्या प्रकारें केली जाते. वांटपपद्धति, किंमतींचें नियंत्रण, बांधकाम किंवा नवीन कामें यांसाठी परवाने देणें, उद्योगधंद्यांना महत्त्वाच्या सूचना किंवा आर्थिक विलोभनें, इ. मार्गांचा अवलंब केला जातो. विशेषतः अलिकडे युद्धतयारीच्या प्रयत्नांत नियोजनाच्या बाबतींत सल्ला देणाऱ्या मंडळाचें कार्य प्रशंसनीय झालें आहे.

---

### मजदूर जगत्

इंडियन लेबर गॅझेटची हिंदी आवृत्ति काढण्याचें भारत सरकारच्या मजूर खात्यानें ठरविलें आहे. 'मजदूर जगत्' हें त्याचें नांव राहणार असून या मासिकांत भारतांतील व परदेशांतील कामगारांची स्थिति, भारतांतील व इतरत्र ठिकाणांच्या महत्त्वाच्या मजूरविषयक कायद्यांचा गोषवारा आणि कामगारांशीं संबंधित असलेल्या सरकारी व निमसरकारी संस्था यांचे संबंधीं लेख येतील. या सचित्र मासिकाचें संपादन श्री. आय. एन्. गर्तु, १८ गुरुद्वार रोड, नवी दिल्ली हे करणार असून एका प्रतीस बारा आणे पडणाऱ्या या मासिकांत १०० पृष्ठें राहातील. या मासिकाचा पहिला अंक ऑक्टोबर, १९५१ मध्यें प्रकाशित होईल.


# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना-१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८१ | "Cencobank" | नं. ५११ |

**मुख्य कचेरी—लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

**जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर पौड व वडगांव (मावळ)**

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल. | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्धाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर

### कापड सहकारी खरेदी–विक्री पतपेढी लि., कराड.

या सोसायटीचा चौदावा वार्षिक अहवाल व ताळेबंद पहातां संस्थेची प्रगति चांगल्या तऱ्हेनें होत असल्याचें दिसून येतें. अहवालाचे साली सोसायटीनें रु. २१,९५,८७९–११–१ ची उलाढाल केली असून त्या व्यवहारांत रु. ५९,७६३–१४–६ कमिशन संस्थेनें मिळविलें आहे. सोसायटीस निव्वळ नफा रु. ९,८२३–१२–९ झालेला आहे. संस्थेकरतां 'माझे सहकारी मंदिर' नांवाची इमारत पुरी करण्याचा सुयोग लौकरच येणार आहे. ही गोष्ट संस्थेचें व्यवस्थापक मंडळ व त्यांचे सहकारी यांस भूषणावह आहे. (चेअरमनः श्री. भिकोबा अप्पाजी साळुंखे मॅनेजरः भगवानराव नारायणराव जाधव.)

---

### दि अर्बन को. बँक लि. सांगली (द. सातारा)

१९५०–५१ अहवालाचे साली बँकेची मार्गी प्रगति झालेली आहे. संस्थेच्या शेअर्समध्यें १६,७८० रु. ची वाढ झालेली असून ठेवीमधील रु. २,७०,३६६ ची झालेली वाढ बँकेचा उत्कर्ष दाखवीत आहे. संस्थेच्या इमारतीचें बांधकाम चालू वर्षीच सुरू झालेलें आहे, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. अहवालाचे साली रु. ३४,०६१–११०–इतका नफा बँकेस झाला असून ६½ प्रमाणें डिव्हिडंड वाटला जाणार आहे.

(चेअरमनः ग. को. गोडबोले, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : ल. य. लागू, बी. ए., एलएल. बी.)

---

### दि पूना अर्बन को. बँक लि., पुणें

१९५०-५१ सालामध्यें बँकेला निव्वळ नफा रु. ३,१२३-८-३ झाला असून बँकेनें ३½ दरानें शेअरवर डिव्हिडंड देण्याचें ठरवलें आहे.

(चेअरमनः दिगंबर विष्णु इनामदार. सेक्रेटरीः पांडुरंग विष्णु इनामदार.)

---

### कोपरगांव पीपल्स को. बँक लि., कोपरगांव

अहवालाचे साली बँकेच्या शेअर भांडवलामध्यें रु. ११,६००।– नें वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणें बँकेंतील ठेवीमध्येंही वाढ दिसून येत आहे. बँकेचे अहवालाचे साली रु. ५,९४,२९१ इतकें खेळतें भांडवल असून बँकेला रु. ८,७२२–९–९ इतका निव्वळ नफा झालेला आहे. चालू वर्षी बँकेनें ५।· टक्के डिव्हिडंड दिलेलें आहे. (सुपरव्हिजन कौन्सिलचे चेअरमन : रा. ब. नारायणराव सोपानराव बोरावके. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सचे चेअरमन : श्री. मोहनदास कालीदास व्यास. मॅनेजर : जी. पी. ठाणेकर, बी. ए.)

---

### दि कऱ्हाड अर्बन को. बँक लि., कऱ्हाड

बँकेचें शेअर भांडवल १,४५,६४० असून, खेळतें भांडवल २९,६१,३८७ रु. आहे. अहवालाचे साली बँकेस रु. २९,७२८-१३-६ इतका नफा झाला असून शेअसवर ६¾ टक्के डिव्हिडंड जाहीर केला आहे. तारण जंगम मालाच्या सुरक्षिततेसाठी मुद्दाम इमारतींची सोय पूर्ण झाली असली तरी सोनें, चांदीसारख्या मौल्यवान् जिनसासाठी "सेफ डिपॉझिट व्हॉल्ट" ची बँकेला अत्यंत गरज वाटूं लागली आहे.

(चेअरमनः पु. पां. गोखले. मॅनेजिंग डायरेक्टरः शं. पु. कुलकर्णी.)

---

### कॉसमॉस को. अर्बन बँक लि., पुणें.

अहवालाचे साली बँकेस एकूण रु. १४,८३२–१०–११ इतका नफा झालेला आहे. सभासदासाठी ६¼% डिव्हिडंड जाहीर केला असून रु. ३,७०६ ची भर चालू वर्षी बँकेच्या गंगाजळींत पडलेली आहे. (अध्यक्ष : श्री. ना. वि. पांडव, बी. ए. कार्याध्यक्ष : श्री. ज. द. वैद्य, बी. ए. कार्यवाह : श्री. य. श्री. शाळीग्राम)

---

### दि इस्लामपूर को. पीपल्स बँक लि., पुणें.

१९५०–५१ मध्यें संस्थेचें शेअर भांडवल रु. ३२,२२० इतकें आलें असून बँकेच्या ठेवीमध्येंही थोडीशी वाढ झालेली आहे. ४ मे, १९५१ रोजीं बँकेस पंचवीस वर्षे पुरीं झालीं असून बँकेचा रौप्यमहोत्सव साजरा होणार आहे. बँकेनें ५% प्रमाणें नफा वाटण्याचें ठरविलें आहे.

(चेअरमनः एम. डी. पवार. मॅनेजरः डी. डी. लाटकर.)

---

### दि जमखंडी अर्बन को. बँक लि., जमखंडी

बँकेचें शेअर भांडवल, १,५३,१०५ रु. असून अहवालाचें साली बँकेस खर्च वजा जातां निव्वळ नफा रु. ३८,५११-११-० इतका झालेला आहे. भागीदारांना शेकडा ५ प्रमाणें डिव्हिडंड जाहीर केला आहे.

(चेअरमनः एस. एम. अथणी. मॅनेजरः म. द. खाडिलकर.)

---

### दि इचलकरंजी सेंट्रल को. बँक लि.

बँकेचें वसूल झालेलें भांडवल रु. ९७,३७५ असून बँकेस अहवालाचे साली रु. २९,६६९-१४-११ इतका नफा झाला आहे. शेअर होल्डर्संना ६¼% डिव्हिडंड जाहीर केला आहे. चालू साली सर्व प्रकारचे खात्यांवर रकमांची मागणी बरीच आली व ती पुरविण्यांत आली. मोठ्या प्रमाणांत उलाढाल करूनहि बँकेनें सहकारी कायद्याप्रमाणें लागणारें तरतें भांडवल योग्य प्रमाण्यांत ठेवलें आहे.

(चेअरमनः–गणपती देवाप्पा शेट्टी. मॅनेजरः दौलतराव रामजी काळे.)

---

### भारतांत गेल्या ६ वर्षांतील अन्नधान्याची आयात

१९४६ ते १९५० व ३१ जुलै १९५१ पर्यंत भारतांत पुढीलप्रमाणें अन्नधान्याची आयात झाली आहे :–

| वर्ष | एकूण धान्य हजार टन | किंमत (लक्ष रुपये) |
|---|---|---|
| १९४६ | २,२४९ | ७,६११ |
| १९४७ | २,३३४ | ९,३९९ |
| १९४८ | २,८४१ | १२,९७२ |
| १९४९ | ३,७०६ | १४,४६० |
| १९५० | २,१०४ | ७,९८४ |
| १९५१ (३१ जुलै पर्यंत) | २,६२१ | १०,८१० |

---

**मिशांची किंमत १० हजार डॉलर्स**—सुप्रसिद्ध अमेरिकन नट अॅडॉल्फ मेंजू ह्यानें आपल्या झुपकेबाज मिशा एका भूमिकेसाठी काढून टाकण्याचें कबूल केलें. पण त्यासाठी त्यानें निर्मात्याकडून १० हजार डॉलर्स मागितले. त्याचप्रमाणें पुन्हा मिशा येईपर्यंत वापरण्यासाठी म्हणून कृत्रिम मिशा पुरवाव्या अशीहि मागणी केली. दोन्ही मागण्या मंजूर झाल्या.

## कॉँक्रीटचा नवा प्रकार

भारत सरकारच्या संरक्षण खात्यांतील स्थापत्यशास्त्र संशोधन केंद्रानें हलक्या वजनाचें कॉंक्रीट शोधून काढलें असून भारतांत इमारत बांधणीच्या सामग्रीच्या तुटवड्यामुळें निर्माण झालेला प्रश्न त्यामुळें बऱ्याच अंशीं सुटेल. विशेष निष्कर्ष काढण्यांत आलेले अलीकडील कांहीं प्रयोग म्हटले म्हणजे कॉंक्रीट पक्कें करणें व काळी जमीन पक्की करण्याची नवी पद्धत यासंबंधीं होत.

कॉंक्रीटचा हा नवा प्रकार नेहमींच्या सीमेंटच्या वाळूपेक्षा अगर ओबडधोबड कॉंक्रीटपेक्षां निराळा आहे; विशिष्टगुरुत्व व उष्णतावाहक शक्तींत तें यापेक्षां कमी असून तें कापतां येतें अगर त्यांत खिळेहि ठोकतां येतात. तसेंच वजन पेलण्यासाठीं भिंतींत छोटे ठोकळे, म्हणून छतासाठीं सामग्री म्हणून अगर पोलाद व इतर धातूंच्या बांधणीवर आगीपासून बचाव करणारें आच्छादान म्हणूनहि त्याचा उपयोग करतां येतो. फुकट गेलेल्या मालापासून हें कॉंक्रीट तयार करण्यांत येत असल्यामुळें त्याच्या वापरानें बांधणीचा खर्च कमी होतो.

कॉंक्रीट पक्कें करण्याबाबत या केंद्रावर करण्यांत आलेल्या प्रयोगांवरून असें दिसून आलें आहे कीं. या कामीं पाण्याऐवजीं देशी तेलें, डांबर वगैरे पदार्थांचाहि उपयोग करतां येईल.

पोर्टलँड सीमेंट कॉंक्रीटचा उपयोग करण्यापूर्वी सर्वसाधारणतः तें टणक करावें लागतें. त्यावर पाण्याचे फवारे मारून अगर ओली गोणपाटें वा पेंढा टाकून हें करण्यांत येतें. मुबलक पाणी असलेल्या ठिकाणीं ही पद्धत सोपी जात असली तरी पाण्याची टंचाई असलेल्या ठिकाणीं अडचण निर्माण होते. कॉंक्रीटचे रस्ते अगर विमानतळ यांसारख्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणावर कॉंक्रीटचा उपयोग केला जातो त्या वेळीं ही अडचण विशेषतेनें भासते.

रस्ते तयार करतांना काळ्या जमिनींतील भेगांमुळें येथील स्थापत्यशास्त्रज्ञांपुढें बराच काल एक प्रश्न उभा आहे. हा प्रश्न सोडविण्यासाठीं सीमेंट व इतर कांहीं रसायनांचे साह्यानें जमीन पक्की करण्याच्या अनेक पद्धती करून पाहाण्यांत आल्या, परंतु त्या यशस्वी झाल्या नाहींत. तथापि या केंद्रावर अशी जमीन पक्की करण्याकरितां त्यांत एका रसायनाचें मिश्रण करण्याची पद्धत शोधून काढण्यांत आल्यानें या कामीं यश येईल असें वाटतें.

---

### बालमृत्यु, क्षय, देवी व पटकी

१९५१ च्या पहिल्या सहामाहींत कलकत्ता शहरांत जेवढे लोक मृत्यु पावले, त्यांपैकीं सुमारें एक-चतुर्थांश एक वर्षाखालील बालकें होतीं. एकुण २६,२४० मृत्यूंपैकीं ६,५६२ मृत्यू देवीमुळें झाले. क्षयरोगास १,३६९ बळी पडले आणि पटकीच्या रोगानें १,३२८ मृत्यू झाले.

---

### दुभतीं जनावरें पुष्कळ, पण दूध मात्र फार कमी

जगांतील एकुण जनावरांपैकीं एक-पंचमांश जनावरें भारतांत आहेत, परंतु त्यांचेपासून दूध मात्र फारच कमी मिळतें. डेन्मार्कमध्यें प्रत्येक दुभतें जनावर सरासरीनें ७,००५ पौंड दूध देतें. ऑस्ट्रेलियांत तें ३,४६२ पौंड देतें. भारतांतील म्हैस दरसाल सरासरीनें १,२२९ पौंड व गाय ४८७ पौंड दूध देते.


### ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

### बँक ऑफ पूना, लिमिटेड.

(शेड्यूल्ड बँक)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, (चेअरमन)
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल., बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—

चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, ३ वर्षे ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिस:—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे.
मॅनेजर.



किर्लोस्कर बंधु लिमिटेड किर्लोस्करवाडी


हें पत्र पुणें, पेठ मांगुडा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.